**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सोहळा :** प्रतिदिन ४.६ मीटर वेगाने काम, २५० अभियंते, तंत्रज्ञ आणि कामगारांचा सहभाग

# मेट्रो-३ चे सव्वा किलोमीटर भुयार २५९ दिवसांत पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मेट्रो-३ च्या पॅकेज ७ मधील १.२६ किमी इतके भुयाराचे काम सोमवारी पूर्ण झाले. वैनगंगा १ या टनेल बोअरिंग मशीनने २५९ दिवसांत हे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण केले. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ च्या भुयारीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सोमवारी झाले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ-टर्मिनल २ येथे हा सोहळा पार पडला. २५० अभियंते, तंत्रज्ञ आणि कामगार यांच्या मेहनतीमुळे हे भुयारीकरण पूर्ण झाले.

मुंबई भूगर्भ बेसाल्ट, ब्रेशिया तसेच टुफ अशा प्रकारच्या कठीण खडकांचा आहे. त्यांना भेदत भुयारीकरण करून वैनगंगा १ या टनेल बोअरिंग मशीनने काम केले. शांघाय टनेलिंग इंजिनीअरिंग कंपनीने तयार केलेले हे मशीन ९२ मीटर लांबीचे आहे. प्रतिदिन ४.६ मीटर इतक्या वेगाने ते भुयारीकरण करते. या मशीनने मेट्रो लाइन १ आणि सहार उन्नत मार्ग यांसारख्या पायाभूत सुविधांच्या खालून भुयारीकरण करीत ध्येय साध्य केले.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पूर्ण प्रकल्पातील सुमारे ९ किमी भुयारीकरण पूर्ण झाले आहे. १९ लाख ४० हजार २५४ क्युबिक मीटर मातीचे उत्खनन करण्यात आले आहे. पॅकेज ७ चे हे काम एल ॲण्ड टी आणि शांघाय इंजिनीअरिंग कंपनी संयुक्त भागीदारीत करत आहेत. पॅकेज ७ मधील भुयारीकरणाचा हा टप्पा ७.०७ किमीइतका आहे. त्यातून एकूण ११ लाख क्युबिक मीटर माती उत्खनित होणार आहे. ती तळवली पिसे येथे निर्धारित शासकीय जागेत टाकली जाईल.

तीन वर्षांत मुंबईचा चेहरामोहरा बदलणार- मुख्यमंत्री /३



**मेट्रो-३ चे** पॅकेज ७ मरोळ नाका येथे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो १ आणि जेव्हीएलआर येथे स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-कांजूरमार्ग-विक्रोळी मेट्रो ६ यांना जोडणार आहे. तसेच उपनगरीय रेल्वेने जोडलेली एमआयडीसी, सीप्झ ही औद्योगिक आणि रोजगार केंद्रे जोडणार आहे.